MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**मुख्य महाव्यवस्थापक (सांघिक वित्त) यांचे कार्यालय**
मुख्य कार्यालय, प्रकाशगड, मुंबई ४०० ०५१
दूरध्वनी क्र. २२६४७४२११ / २६४७४१३१

मुमव्य(सां.वि.)/मराविविकं/ २०५८/११३६४ दिनांक - २३.०४.२०१३

## सुधारपत्रक

**विषय - कंत्राटी कामगार व सुरक्षा रक्षकांच्या वेतनाबाबत.**

संदर्भ - मुख्य महाव्यवस्थापक (विवले) यांचे पत्र क्र. मु.म.व्य(नि.वि.)/लेखा/९९६ दिनांक २५/०२/२०१३.

महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणा-या कामगारांना किमान वेतन वेळोवेळी देण्याबाबत सांघिक कार्यालयाकडून परिपत्राव्दारे आपणांस निर्देशित करण्यात आले आहेत. क्षेत्रिय कार्यालयांना स्पष्ट निर्देश देऊन देखील विविध कामगार कायाद्यान्वये बंधनकारक असणा-या तरतुदींचे पालन केले जात नाही. सुरक्षा रक्षक व कंत्राटी कामगारांना नियमाप्रमाणे व वेळेवर वेतन मिळत नाही इत्यादी प्रकारच्या तक्रारी सांघिक कार्यालयात प्राप्त होत आहेत.

वरील विषयास अनुसरुन सुरक्षा रक्षक व कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन देण्याच्या उद्देशाने अर्थोपाय विभागाकडून प्रत्येक महिन्याला मंडळ / परिमंडळ / विभाग कार्यालयाच्या मासिक वेतनाच्या निधी सोबत १० टक्के अधिक रक्कम पाठविली जाते. ही १०टक्के अधिक रक्कम सुरक्षा रक्षक व कंत्राटी कामगार यांचे वेतन, वीजसेवक वेतन, ओव्हरटाईम (O.T.), अग्रधन व इतर मासिक भत्ते या करिता वापरण्यात यावी.

वरीलप्रमाणे निर्देशित केलेल्या उपाय योजनांची प्रभावीपणे त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर सुधारपत्रक हे वरील संदर्भीत परिपत्रकाचे सुधारित आवृत्ती आहे.

वरील परिपत्रक महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
२३/०४/१३
**मुख्य महाव्यवस्थापक (सां.वि.)**

**प्रत रवाना :**

**१) सर्व अधिक्षक अभियंता, महावितरण, संवसु मंडळ कार्यालये**
**२) सर्व कार्यकारी अभियंता, महावितरण, संवसु मंडळ कार्यालये**
**३) व्यवस्थापक (अर्थोपाय), महावितरण, हाँगकाँग बँक बिल्डींग, मुंबई**

D:\GM(F&A)\Marathi 2010\Circular Security Guard 200413.docx